Vol. 6 | Special Issue 1 | March 2019

ISSN 2394 - 7632
EISSN 2394 - 7640
Special Issue

# SCHOLARS IMPACT

Quarterly

International Multidisciplinary Multilingual Journal of Contemporary Research

UGC Approved Journal No- 41129

IMPACT FACTOR - 5.98

## Special Issue



✣ EDITOR IN CHIEF ✣

DR. M. RAGHIB DESHMUKH

Issue Editors

Dr. Kalyan Gangarde
Dr. Swati R. Bhise

MAHATMA GANDHI

Scanned with Oken Scanner

20.

# भारतातील सहकारी चळवळीचे वाटचाल व प्रगतीचे मूल्यमापन

प्रा.डॉ.माधवराव नरसिंगराव बिरादार
सहयोगी प्राध्यापक आर्थशास्त्र विभाग,
दिगंबरराव बिंदु महाविद्यालय, भोकर जि. नांदेड

प्रस्तावना : भारतामध्ये सहकाराचा इतिहास अनेक शतकाचा असला तरी चळवळ या अर्थाने खरी सुरुवात 1904 च्या सहकारी संस्थांचा कायद्यापासून झाली. भारतातील सहकारी चळवळीचा उगम होण्यास एकोणिसाव्या शतकांतील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा व पिळवणूक कारणीभूत ठरली. या कायद्याने भारताच्या आर्थिक व सामाजिक इतिहासात मोठा बदल घडवुन आणला. 'दारिद्रयातून सुबतेकडे जाण्याचा मार्ग' अशा शब्दात या चळवळीचे वर्णन केले गेले. परंतु या कायद्यात केवळ पतपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्थाचीच तरतूद करण्यात आली होती. तसेच ग्रामीण व शहरी संस्थांना वेगळे माणण्यात आले होते. देखरेख आणि भांडवलाचा पुरवठा यासाठी केंद्रीय संघटनेची आवश्यक अशी तरतुद या कायद्यात नव्हती. हे दोष दूर करुन सहकारी चळवळ अधिक व्यापक करण्याच्या हेतूने सन 1912 मध्ये सहकारी संस्थांचा आधुनिक कायदा पास करण्यात आला. या कायद्यामुळे पतपुरवठ्याशिवाय इत्तर विविध क्षेत्रात विविध प्रकारच्या सहकारी संस्था स्थापनेचा मार्ग मोकळा झाला. सहकारी संस्थांवर नियंत्रण ठेवुन त्यांना भांडवलाची मदत करण्यासाठी मध्यवर्ती बँका काढण्यात आल्या. त्यामुळे सहकारी चळवळीच्या प्रगतीचा वेग वाढता. सन 1920 ते 1930 या दशकात सहकारी संस्थांची बरीच प्रगती झाली आणि तथापि या दशकाच्या शेवटी जागतिक मंदीची लाट आली आणि शेतमालाच्या किंमतीमध्ये अभूतपुर्व घट झाली. त्यामुळे सहकारी संस्थाकडुन घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यास शेतकरी वर्ग असमर्थ ठरला. असंख्य सहकारी संस्थांचे दिवाळे निघाले. जागतिक मंदीच्या लाटेमुळे भारतातील सुमारे एक चतुर्थांश सहकारी संस्था नष्ट झाल्या. सहकारी चळवळीची फार मोठी पिछेहाट झाली. त्यामुळे मंदीनंतरच्या काळात सहाकारी संस्थांची संख्या वाढविण्यापेक्षा उरलेल्या संस्थांची मंदीच्या प्रभावातून सावरण्यावर जास्त भर द्यावा लागला.

मंदीचे प्रतिकूल परिणाम दूर करण्याचे काम दूसऱ्या महायुद्धाने केले. युद्धकाळात निरनिराळ्या वस्तुंच्या किंमतीत वाढ झाली. त्यामुळे पतपुरवठा संस्थांची कर्जवसुली आणि सभासद संख्या यातही वेगाने वाढ झाली. वस्तूच्या तूटवड्यामूळेच ग्राहकांच्या सहकारी संस्थाना वेगवेगळ्या रुपात चालना मिळाली. सन 1938-39 मध्ये या चळवळीत 6 टक्के लोकसंख्या समाविष्ठ होती. युद्धाच्या शेवटी हे प्रमाण 16 टक्यापर्यंत झाले होते.

सन 1947 मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर खऱ्या अर्थाने सहकारी चळवळीचा विकास अपूलकीने केला गेला. सहकारी चळवळीच्या विकासाकडे काळजीपुर्वक लक्ष दिले गेले. सन 1948 च्या धोरणात देखील सहकाराच्या विकासात भर देण्यात आला. कृषी क्षेत्रातील सहकाराचे स्थान व महत्व लक्षात घेता सरकारने सहकारी क्षेत्राला प्राधान्य देण्याचे ठरविले व सहकारी चळवळीचा नियोजनबद्ध व संतुलीत विकास करण्याचे धोरण अवलंबिले. त्याकरीता भारताच्या नियोजन आयोगाने देखील नियोजनबद्ध आर्थिक विकासासाठी सहकार हे माध्यम आहे. हे विचारात घेऊन नियोजन काळात पावले उचलली. सहकारी चळवळीच्या विकासाकरीता केंद्र सरकारने व त्या-त्या राज्य सरकारांनी कालबद्ध कार्यक्रम तयार करुन सहकारी संस्थांना प्रगतीपथावर आणले. या काळात सहकारी चळवळीचा अभ्यास करण्यासाठी अनेक समित्या तसेच अभ्यासगटाची स्थाना करण्यात आली. त्यांनी सूचविले त्या शिफारशीची वेळोवेळी अंमलबजावणी करुन सहकारी चळवळीला योग्य दिशा देण्याचा प्रयत्न केला गेला. यामध्ये गोरवाला समितीच्या शिफारशी महत्वपुर्ण ठरल्या. भारतीय सहकारी चळवळीचा पाया मजबूत व भक्कम करण्यासाठी आणि सहकारी चळवळीचा गुणात्मक विकास घडून येण्याकरीता या समितीचे योगदान हे ऐतिहासीक ठरले. यानंतरही अनेक समित्यांनी आपापले अहवाल केंद्र सरकार व राज्य सरकारला सादर केले. त्यानुसार केंद्र सरकारने राज्यांना सहकारी क्षेत्राबाबत कायदे, नियम व पोटनियम तयार करण्याच्या सूचना दिल्या व त्यानुसार महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र सहकारी कायदा 1960 मंजूर केला.

**सहकारी चळवळीची प्रगती :-**

भारतात सहकारी चळवळ सुरु होऊन शंभर वर्षापेक्षा अधिकचा काळ लोटला. सन 2004 हे वर्ष सहकारी चळवळीचे शतकपुर्ती वर्ष म्हणुन साजरा करण्यात आले. वस्तुत: कोणत्याही चळवळीला स्वत:ची उपयुक्तता, क्षमता आणि श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी इतका प्रदीर्घकाळ पुरेसा झाला. या काळात सहकारी चळवळीने अनेक चढ-उतार अनूभवले. सहकाराचे मुळातच बिज असलेल्या भारतीय समाजाने ही चळवळ शंभर वर्षातच अधिकाधिक वृद्धीगत करुन तिला यशस्वी केले आहे. सहकारी चळवळीचे यश हे संख्यात्मक व गुणात्मक पातळीवर तपासले जाते.

**संख्यात्मक प्रगती :-** सहकारी चळवळीच्या प्रगतीची सद्यस्थिती पुढील तक्ता क्र.1 मध्ये दर्शविलेली आहे.

**तक्ता क्रमांक 01 सहकारी चळवळीची सद्यस्थिती :-**

| तपशील | सन 2014-15 |
|---|---|
| एकुण सहकारी संस्था | 833560 |
| पतसंस्थांची संख्या | 141118 |
| गैर पतसंस्थांची संख्या | 692442 |
| एकुण सभासद संख्या (मिलियन) | 27497 |
| एकुण वसूल भागभांडवल (मिलियन | 383285 |



Scanned with Oken Scanner

| | |
|---|---|
| रुपये) | |
| एकुण खेळते भांडवल (मिलियन रुपये) | 7295766 |
| राष्ट्रीय पातळीवरील सहकारी संघ संस्था | 17 |
| राज्या पातळीवरील सहकारी संघ संस्था | 399 |
| जिल्हा पातळीवरील संघ संस्था | 3571 |
| बहुउद्देशीय सहकारी संस्थांची संख्या | 1255 |
| प्राथमिक कृषी पत संस्था | 92789 |
| प्राथमिक पतसंस्थांनी व्यापलेली खेडी | 629778 |
| प्राथमिक कृषी पतसंस्थांची सभासद संख्या (मिलियन) | 12109 |
| प्राथमिक कृषी पत संस्थेचे भागभांडवल (मिलियन रुपये) | 110683 |
| शासनाचा सहभाग | 7.54% |
| प्राथमिक कृषि पतसंस्थांच्या एकुण ठेवी (मिलियन) | 846163 |
| प्राथमिक कृषी पत संस्थाकडून वितरीत केलेली रक्कम (मिलियन रुपये) | 1627921 |
| प्राथमिक कृषीपत संस्थांची येणे रक्कम (मिलियन रुपये) | 1077003 |

आधार : National Co-operative Union of India 2016

वरील सांख्यीकीय आकडेवाडीनुसार असे दिसून येते की, 31 मार्च 2015 पर्यंत देशातील सर्वप्रकारच्या सहकारी संस्थांची एकुण संख्या ही 833560 इतकी असून त्यात सर्व प्रकारच्या पतसंस्था ची संख्या ही 141118 आणि गैरपतसंस्थांचे संख्या ही 692444 इतकी आहे. या सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची एकुण सभासद संख्या ही 27497 मिलियन इतकी आहे. त्यांचे वसूल भांडवल व खेळते भांडवल अनुक्रमे 383285 मिलियन रुपये आणि रु. 7295766 मिलियन रुपये आहे. सहकारी चळवळीचा सर्वात जास्त प्रसार ग्रामीण पतपुरवठ्याच्या क्षेत्रात झाला असुन या संस्थांनी देशातील 94 टक्के खेडी व्यापलेली आहेत. तेथे त्यांनी वितरित केलेली कर्जाची रक्कम ही रु. 1627921 मिलियन रुपये इतकी आहे. एकुण ग्रामीण पतपुरवठ्यात सहकारी पतपुरवठ्याचा हिस्सा 1951 मध्ये केवळ 3.1 टक्का होता. तो सन 2014-15 मध्ये 17.48 टक्के पर्यंत वाढला आहे. ग्रामीण पतपुरवठ्याचे क्षेत्र वगळता इतर क्षेत्रामध्ये मात्र सहकारी चळवळीचा पूरेसा प्रसार होऊ शकलेला नाही. शेतीमालाची खरेदी-विक्री प्रक्रिया, शेतीची लागवड, पाणी पुरवठा ही अशी इतर क्षेत्रे आहेत, ज्यामध्ये सहकारी मार्गाने ग्रामीण परिवर्तनाचे उदिष्ट् साध्य होऊ शकते.

**गुणात्मक प्रगती :-**

वरील आकडेवाडीवरुन भारतीय सहकारी चळवळीचा संख्यात्मक विकास हा प्रचंड प्रमाणात झालेला दिसुन येतो. परंतु गुणात्मक विकास जेवढा व्हावयास हवा होता तेवढा झालेला दिसत नाही. अनेक कार्यामध्ये सरकारचा हस्तक्षेप, सहकारी संस्थेचे अड्डे म्हणुन वापर, तसेच सभासांची स्वार्थी वृत्ती यामूळे चळवळ ही एकांगी प्रवास करीत राहिली. तरी देखील अर्थव्यवस्थेमध्ये सहकारी चळवळीचे मोठ्या प्रमाणात बजावली आहे. हे पूढील तक्यावरुन लक्षात येईल.

तक्ता क्रमांक 02 : देशाच्या अर्थव्यवस्थेत सहकारा (2014-15)

| तपशिल | टक्केवारी |
|---|---|
| ग्रामीण भागाचा समावेश | 94.00 |
| कृषीपत पुरवठा | 17.48 |
| लहान व सीमांत शेतकऱ्यांना अल्पकर्जाचे विवरण | 22.71 |
| किसान क्रेडीट कार्ड वाटप | 75.71 |
| खत वितरण | 36.00 |
| खते उत्पादन | 21.85 |
| साखर उत्पादन | 35.15 |
| गहू खरेदी | 24.80 |
| तांदुळ खरेदी | 14.80 |
| दुध खरेदी | 9.50 |
| माच्छीमारी | 69.87 |
| रोजगार निर्मिती | 13.30 |
| स्वंयरोजगार निर्मिती | 10.91 |

आधार : National Co-operative Union of India 2016

**सहकारी चळवळीची यशप्राप्ती :-** भारतीय सहकारी चळवळ संख्यात्मक व गुणात्मक प्रगती केली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सहक चळवळीचा सर्वांगीण विकास झालेला दिसून येतो. कृ पतपुरवठ्याबाबत गौरवास्पद संपादणुकीसोबत शेतमालाचे विपण प्रक्रिया उद्योग, औद्योगिक उत्पादन, गृहनिर्माण, नागरी पुरव सहकारी शेती, शेती उपयोगी सेवा, पाणी पुरवठा, दुग्धव्यवसाय, पी संरक्षण, ग्राहकांसाठी जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा, विमा व वाहतूक इत्यादी क्षेत्रामध्ये विकास साधून भरीव यश संपादन केले आहे सहकारी चळवळीच्या व्यापक विकासामुळे ग्रामीण व नागरी जीवनाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक या सर्व अंगांना स्पर्श केला आहे. त्या दृष्टीने सहकारी चळवळीची आर्थिक, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक फलप्राप्ती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

1. शेतकऱ्यांना शेतीकरीता कमी व्याजदराने कर्जपुरवठा उपलब्ध झाला. यामुळे बऱ्याच प्रमाणात त्यांची सावकाराच्या जाचातून सुटका झाली.
2. ग्रामीण कारागीर, शेतीवर आधारित कूटीउद्योग यांना स्थानिक पातळीवर कर्जपुरवठा होऊ शकेल अशी सहकारी पतसंस्थांची स्थापना करण्यात आली.

Scanned with Oken Scanner

शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव मिळावा याकरीता खरेदी-विक्री संस्थांची स्थापना करण्यात आली. त्यांच्या मालास चांगला बाजारभाव मिळवून देण्यास या संस्थेतर्फे प्रयत्न केले जातात.

शेतीच्या विकासाकरीता विशेष प्रयत्न सहकारी चळवळ करीत आहे. शेती-अवजारे, बी-बियाणे, पाणीपुरवठा अशा कित्येक कामाकरीता सहकारी संस्था ग्रामीण भागातून कर्जपुरवठा करतात.

ग्रामीण भागात सहकारी बँकींगचे जाळे तयार करुन ग्रामीण जनतेला बँकींगच्या सुविधा पुरविण्यात आल्या. त्यांना बचतीची व काटकसरीची सवय लावून ठेवी ठेवण्याकरीता प्रयत्न केले आहे.

सहकारी क्षेत्रात ग्रामीण भागातून तसेच शहरी भागातून अनेक ग्राहक भांडाराची स्थापना होऊन ग्राहकांना कमी किंमतीत वस्तु पुरविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

सहकारी चळवळीने ग्रामीण तसेच शहरी भागातून प्रचंड रोजगारनिर्मिती केली आहे. तसेच स्वंयरोजगारासाठी विशेष प्रयत्न देखील सातत्याने केले जात आहे.

सहकारी क्षेत्राने ग्रामीण भागातून व्यवसाय करणाऱ्या कारागीरांना, लघुउद्योग, स्वंयरोजगाराना कर्ज पुरवठा करुन ग्रामीण औद्योगिकरणास हातभार लावला आहे.

ग्रामीण तसेच शहरातून महिला सहकारी संस्था स्थापन करुन महिलांच्या आर्थिक विकासाकरीता पुष्कळ प्रयत्न सहकारी चळवळीने केले आहे.

0. वाहतुक, घरबांधणी, पाणीपुरवठा अशा कित्येक क्षेत्रात सहकाराने देशात आपले स्थान निर्माण केले आहे.

1. समाजाचे राहणीमान सुधारण्यास सहकारी चळवळीने अलिकडच्या काळात विशेष प्रयत्न केले आहेत.

2. सहकार क्षेत्राच्या विकासामुळे अन्नधान्ये निर्मितीस मोठ्या प्रमाणात साहाय्य होऊन अन्नधान्याच्या बाबतीत भारताला स्वावलंबी बनविण्यास प्रचंड सहकार्य केले आहे.

3. सहकारी क्षेत्राने विकासाच्या दृष्टीने नियोजन पद्धतीस व सरकारच्या विविध योजना ग्रामीण भागापर्यंत पोहोचविण्यात सकारात्मक सहाय्य केले आहे.

4. सहकारी चळवळीने देशात लोकशाही तत्वाची जाण असणारे प्रामाणिक व जागृत नागरीक तयार होण्यास मदत झ ाली आहे.

15. सहकारी चळवळीने देशाला मोठ्या प्रमाणात राजकीय नेतृत्व दिले आहे.

ळीचे अपयश :- सहकारी चळवळ निरनिराळ्या दृष्टीने यशस्वी मदायक ठरली असली तरी भारतामध्ये ही चळवळ सुरु होऊन काळ लोटला आहे. परंतु त्या मानाने तिचे यश नजरेत ासारखे नाही. चळवळीचा दीर्घ इतिहास अनेक प्रकारची मदत घटक विचारात घेता झालेले लाभ सामान्य ठरतात. उलट या ळीचे दोष आणि त्यातून आलेले अपयश विदारक आहेत. या शाची कारणमिमांसा पुढीलप्रमाणे देता येईल.

1. सहाकरी चळवळीत लोकांचा उत्स्फूर्त सहभाग किंवा पुढाकाराचा अभाव आढळतो. आजही तिला लोकांची चळवळ हे स्वरुप प्राप्त झाले नाही.
2. सहकारी तत्वाचे ज्ञान व शिक्षण नसलेले कर्मचारी व पदाधिकारी ही बाब सहकारी चळवळीच्या संदर्भात मारक ठरली आहे.
3. सहकारी क्षेत्रातील संस्थांना आपल्या सभासदाच्या गरजा भागविण्यासाठी भांडवलाची कमतरता आहे. त्यामूळे सभासदांचा पूरेसा कर्जपूरवठा वेळेवर करु शकलेली नाही.
4. दिलेले कर्ज व्याजासहीत आणि ठराविक मूदतीत परत न आल्याने ते कर्ज देणाऱ्या संस्थेची आर्थिक सुदृढता धोक्यात आली आहे. वसूली कडकपणे करण्याबाबत सरकारही उदासीन आहे.
5. सहकारी चळवळीमध्ये शिखर व संघ संस्था या पालक संस्था आहेत पण प्रत्यक्षात या संस्था आपल्या सदस्य संस्थांच्या व प्राथमिक संस्थांच्यां आर्थिक हिताकडे दुर्लक्ष करतात.
6. सहकारी चळवळीने देशातील ग्रामीण भागातील सर्व जनतेस आपल्या क्षेत्राखाली आणले असले तरी सहकारी संस्थाद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा आणि सवलीतचा लाभ काही कुटूंबांनाच मिळत आहे.
7. गुणवत्तेतील वाढीपेक्षा संख्यात्मक वाढीस दिलेले उत्तेजन ही एक फार मोठी चूक ठरली आहे. पुढे अकार्यक्षम संस्थांचे कार्यक्षम संस्थामध्ये सम्मीलन करण्यात आले तरी या प्रवृत्तीत फारसा फरक पडला नाही.
8. सहकारी क्षेत्रात भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढल्याची टिका केली जाते. त्यात काही प्रमाणात तथ्य आहे. कायदेशीर आणि प्रशासकिय मार्गाने त्यावर उपायोजना करता येणे शक्य आहे.
9. सहकारी चळवळीस निस्वार्थी, निष्ठावंत व प्रामाणिक नेतृत्व आवश्यक त्या प्रमाणात लाभले नाही. काही अपवाद सोडल्यास सक्षम नेतृत्वाचा अभाव आढळतो.
10. ग्रामीण भागातून सहकारी क्षेत्राच्या माध्यमातुन नविन नेतृत्व उदयास आले. मात्र या नेतृत्वाने सहकाराचा वापर स्वत:च्या राजकीय विकासासाठी केल्याची टिका केली जाते. त्यात तथ्यही आहे.
11. सकारी संस्थांच्या व्यवहारात व्यावसायीक दृष्टीकोणाचा अभाव आढळतो. त्यामुळे बाजारपेठेत येणाऱ्या बऱ्याच संधीचा लाभ उठवता येत नाही.

अशा तऱ्हेने अनेक दोष शिरलेली सहकारी चळवळ जागतीकरणाच्या लाटेत कशी टिकणार हा प्रश्नच आहे. तथापि 'सहकारी चळवळ अपयशी ठरली आहे' या विधानाचा दूसरा भाग महत्वाचा आहे. 'परंतु सहाकाराला पर्याय नाही'. कारण तत्वत: सुदृढ असलेली ही रचनाच लोकशाही आधारावर टिकाऊ आणि सर्वसमावेशक विकासाचा मार्ग दाखवू शकते. तेव्हा मूक्त अर्थव्यवस्थेत व जागतिकीकरणाच्या वातावरणात सहकारी

चळवळीला जास्त स्पर्धात्मक बनविण्याकरीता पून्हा एकदा सहकाराची पूनर्रचना करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

**संदर्भसूची :-**

1) रायखेलकर ए.आर / डांगे अशोक (1989), सहकार तत्व आणि व्यवहार, मेहता पब्लीशिंग हाऊस, पुणे
2) जोशी सी.के. (2000), सहकाराचा विकास, फडके प्रकाशन कोल्हापुर
3) चौगूले व्ही.टी. / पणण के.जी. (1980), भारतीय सहकारी चळवळ, कॉन्टीमेंटल प्रकाश, पुणे
4) कुलकर्णी पी.आर (1997), सहकाराची मूलतंत्वे, विद्याबूक्स, पब्लीशर्स औरंगाबाद
5) विजय कविमंडळ (2012), कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र, मंगेश प्रकाशन नागपुर
6) कानेटकर मेघा / रुईकर वैशाली (2015), सहकार आणि ग्रामीण विकास, श्री साईनाथ प्रकाशन, नागापुर
7) माधव बिरादार (2018), सहकार, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद
8) सराफ मोहन / दापके रमेश (1991) सहकार, विद्या प्रकाशन, नागपुर
9) Indian Co-operative Movement, A statistic profit (2016), : National Co-operati Union of India, New Delhi

□□□